**महाराष्ट्र शासन**

*महसूल व वन विभाग,*

*जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग*

(खनिकर्म शाखा)

हिराकोट तलावाजवळ, ता. अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१.

दुरध्वनी क्र. ०२१४१/२२२११८ फॅक्स क्र. ०२१४१/२२७४५१, Email:collector_raigad@maharashtra.gov.in, raigaddmo003@gmail.com

# ई - निविदेसह ई - लिलाव सूचना

## सन २०१६-१७ करिता दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ पर्यंतच्या मुदतीसाठी लिलाव.

यांत्रिक साधनाद्वारे वाळू / रेती उत्खननासाठी राखीव गटांकरीता दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ पर्यंतच्या मुदतीसाठी ई - निविदा सह ई - लिलाव (सन २०१६-१७)

सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सूकर करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २१ मे, २०१५ अन्वये निश्चित केलेले धोरण.

रायगड जिल्हयातील कुंडलिका नदी - रेवदंडा खाडीमधील यांत्रिक साधनांद्वारे रेती उत्खननासाठी राखीव असलेल्या सोबतचे प्रपत्र - अ मध्ये नमूद केलेल्या १५ रेती उपगटांच्या निर्गतीसाठी ई - निविदेसह ई - लिलाव पद्धतीचा अवलंब करण्यात येणार असून सदर प्रक्रिया सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सूकर करण्यासाठी वाळू / रेती निर्गती धोरण दिनांक २१ मे, २०१५ अन्वये महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण यांचेकडील सी. आर. झेड. विषयक अनुमती, शासन पर्यावरण विभागाकडील पर्यावरण विषयक अनुमती व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडील प्राधिकार पत्र क्र. ममेबो/मुकाअ/जआ/टी-९८ x/उत्खनन रायगड/२०१६-१७६५०, दिनांक ६/१०/२०१६ व सर्व्हेक्षण अहवालामधील अटी व शर्तीस अधिन राहून राबविण्यात येणार आहे.

१. ई - निविदेसह ई - लिलाव प्रक्रियेसाठी ICICI बँक व ABC Procure, अहमदाबाद यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

२. या लिलावाच्या प्रक्रियेसंबंधी सर्व माहिती, वाळू / रेती उत्खननासंबंधी अटी व शर्ती यांची सविस्तर माहिती **http://eauctioncollrai.abcprocure.com** या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

३. या लिलाव प्रक्रियेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहिल.

| अ.क्र. | दिनांक | वेळ | प्रक्रिया |
|---|---|---|---|
| १ | ३.११.२०१६ | सकाळी १०.०० पासून | प्रक्रियेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीचे / संस्थेचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन व ई-निविदा भरणे सुरु होईल. |
| २ | १०.११.२०१६ | सायं. ५.०० | ऑनलाईन रजिस्ट्रेशन बंद होईल. |
| ३ | १५.११.२०१६ | सायं. ५.०० | ई-निविदा ऑनलाईन पद्धतीने स्विकारणे बंद होईल. |
| ४ | १९.११.२०१६ | सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत | ई-लिलाव प्रक्रिया......सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत. वेळ समाप्तीच्या वेळी बोली आल्यास संगणकीय प्रणालीद्वारे प्रत्येकी १० मिनीट प्रमाणे ३ (तीन) वेळा वाढ करण्यात येईल. |
| ५ | १९.११.२०१६ | ----- | उक्त लिलावाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर ई-निविदा डाऊनलोड करुन उघडण्यात येईल व ई-निविदा/ई-लिलाव यातील उच्चतम बोली निश्चित करण्यात येईल. |

४. लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी मागील ३ वर्षांची आयकर विवरणपत्रे, पॅन कार्ड, आधारकार्ड, टॅन कार्ड (कंपनी असल्यास) व निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र देणे बंधनकारक राहिल.

५. ई - लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई - निविदा प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहिल.

६. ई - निविदेसह ई - लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्यास प्रत्येक रेती उपगटासाठी पुढीलप्रमाणे ना परतावा फी ऑनलाईन पद्धतीने अदा कराव्या लागतील.

i. नोंदणी फी फक्त एकदाच रु. २८६२.५०/-

ii. फॉर्म फी प्रत्येक वाळू स्थळाकरीता स्वतंत्र रु. २०००/- (१० लाखांपर्यंत अपसेट प्राईस असलेल्या वाळू उपगटाकरीता) व रु. ५०००/- (१० लाखांपेक्षा जास्त अपसेट प्राईस असलेल्या वाळू उपगटाकरीता).

iii. प्रक्रिया फी (प्रत्येक वाळू स्थळाकरीता स्वतंत्र) रु. १५४६/-

७. लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीला प्रत्येक रेती उपगटासाठी प्रपत्र "अ" च्या रकाना १४ मध्ये नमूद केलेली रक्कम अनामत रक्कम ऑनलाईन पद्धतीने भरावी लागेल.

८. ई- निविदा व ई -लिलावाच्या प्रक्रियेबाबत दिनांक ४.११.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग येथे प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहे. इच्छुक व्यक्तींना या प्रशिक्षणासाठी उपस्थित राहता येईल. ज्या व्यक्तींना या प्रशिक्षणासाठी उपस्थित राहणे शक्य नसेल त्यांना **http://eauctioncollrai.abcprocure.com** या संकेतस्थळावर याबाबतचे सादरीकरण (प्रात्यक्षिक) पाहता येईल.

९. ई-निविदा व ई-लिलावाबाबत कोणत्याही अडचणी असल्यास ०७९४००१६८६६/८३८/८७८/८७९ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

क्र. खशा/गौख/रे.खा./ड्रे-गट/रेती लिलाव/१६-१७
स्थळ : अलिबाग
दिनांक : २८.१०.२०१६

सही/-(पी. डी. मलिकनेर)
अपर जिल्हाधिकारी रायगड

## जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचेकडील वाळू/रेती गटाचे जाहीर लिलाव सूचना क्र. खशा/गौख/रेतीगट/चिन्हांकित/ड्रेजर/१५-१६, दिनांक ६/१०/२०१६ सोबतचे

### प्रपत्र - अ

| ड्रेजर रेती गट क्रमांक | खाडीपात्राचे नांव | नकाशा क्रमांक व गटांचे नांव | उप गटाचे नांव | अक्षांश | रेखांश | नौकानयन जलमार्गातील गटाची लांबी व रुंदी (मी.) | सरासरी उपलब्ध खोली (मी.) | निर्माण/ निश्चित करावयाची खोली (मी.) | MMB सर्वेक्षण नुसार उपलब्ध साठा (परिमाण ब्रास) | MCZMA मान्यता प्राप्त उपलब्ध कालावधी करीता उत्खननासाठी अनुज्ञेय साठा (परिमाण ब्रास) | ड्रेजरची संख्या | हातची किंमत (र.रु.) | ई-निविदा/ ई-लिलावाबाबत भरावयाची अनामत रक्कम (र.रु.) (रकाना १३ च्या २०%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| गट क्रमांक ८ | कुंडलिका नदी/ रेवंदडा खाडी | नकाशा क्र. १२०४, मुखापासून ते रेवदंडा, गट -AA१ (खाडीच्या मुखापासून सुरु, लांबी २.६ कि.मी.) | AA१-१ | १) १८रू ३२' ५९ "<br>२) १८रू ३२' ५५"<br>३) १८रू ३२' ५९"<br>४) १८रू ३२' ५५" | ७२रू ५२' ५३"<br>७२रू ५२' ५३"<br>७२रू ५३' २८"<br>७२रू ५३' २७" | लांबी १०००X१०० | ४.३५ | ५.० | २२,९६८ | २२,९६८ | १ | ३१८१०६८० | ६३६२१३६ |
| गट क्रमांक ९ | | | AA१-२ | १) १८रू ३२' ५९ "<br>२) १८रू ३२' ५५"<br>३) १८रू ३२' ५२"<br>४) १८रू ३२' ५०" | ७२रू ५३' २८"<br>७२रू ५३' २७"<br>७२रू ५४' ०१"<br>७२रू ५४' ००" | लांबी १०००X१०० | १.९३ | ५.० | १,०८,४८१ | १,०८,४८१ | ३ | १५०२४६१८५ | ३००४९२३७ |
| गट क्रमांक १० | | | AA१-३ | १) १८रू ३२' ५२ "<br>२) १८रू ३२' ५०"<br>३) १८रू ३२' ४४"<br>४) १८रू ३२' ४१" | ७२रू ५४' ०१"<br>७२रू ५४' ००"<br>७२रू ५४' २३"<br>७२रू ५४' २२" | लांबी ७०० X १०० | २.९८ | ५.० | ४९,९६५ | ४९,९६५ | २ | ६९२०१५२५ | १३८४०३०५ |
| गट क्रमांक - ११ | कुंडलिका नदी/ रेवंदडा खाडी | नकाशा क्र. १२८०, रेवदंडा ते भोनंग, गट - AA (खाडीच्या मुखापासून २.६ कि.मी. अंतरावर सुरु, लांबी ४.० | AA-२ | १) १८रू ३२' ३२".५९<br>२) १८रू ३२' २९".८४<br>३) १८रू ३२' ४१".२७<br>४) १८रू ३२' ३८".०३ | ७२रू ५६' ०७" .८०<br>७२रू ५६' ०९" .१५<br>७२रू ५६' ५१" .६९<br>७२रू ५६' ५१" .५३ | लांबी १३००X रुंदी १०० | ३.५ | ५.० | ६८,९०५ | २३,३६६ | १ | ३२३६१९१०.०० | ६४७२३८२ |

D:\HP Order\Sand-16-17\E-Sand Lilav\Apset 16-17

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गट क्रमांक-१२ | | कि.मी.) | AA-४ | १) १८रू ३२' ३३" .५७<br>२) १८रू ३२' ३०" .४९<br>३) १८रू ३२' २४" .४०<br>४) १८रू ३२' १९" .५४ | ७२रू ५७' ३१" .८६<br>७२रू ५७' ३०" .८५<br>७२रू ५८' ००" .००<br>७२रू ५८' ००" .०० | लांबी ९००X रुंदी १०० | ३.८ | ५.० | ३८,१६३ | २७,१४५ | १ | ३७५९५८२५.०० | ७५१९१६५ |
| गट क्रमांक-१३ | | नकाशा क्र. १२८५, भोनंग ते सुडकोली, गट - BB, (खाडीच्या मुखापासून ६.६ कि.मी. अंतरावर सुरु, लांबी ६.० कि.मी.) | BB-१ | १) १८रू ३२' २४" .४०<br>२) १८रू ३२' १९" .५४<br>३) १८रू ३१' ५५" .२१<br>४) १८रू ३१' ५४" .३२ | ७२रू ५८' ००" .००<br>७२रू ५८' ००" .००<br>७२रू ५८' २०" .१०<br>७२रू ५८' १६" .८० | लांबी १०००X रुंदी १०० | ३.६७ | ५.० | ४६,९९६ | ३०,१७७ | १ | ४१७९५१४५.०० | ८३५९०२९ |
| गट क्रमांक-१४ | कुंडलिका नदी/ रेवंदडा खाडी | नकाशा क्र. १२८५, भोनंग ते सुडकोली, गट - BB, (खाडीच्या मुखापासून ६.६ कि.मी. अंतरावर सुरु, लांबी ६.० कि.मी.) | BB-२ | १) १८रू ३१' ५५" .२१<br>२) १८रू ३१' ५४" .३२<br>३) १८रू ३१' २२" .५४<br>४) १८रू ३१' २२" .३७ | ७२रू ५८' २०" .१०<br>७२रू ५८' १६" .८०<br>७२रू ५८' २३" .८२<br>७२रू ५८' २०" .३१ | लांबी १०००X रुंदी १०० | ३.२ | ५.० | ६३,६०४ | ६३,५७३ | २ | ८८०४८६०५.०० | १७६०९७२१ |
| गट क्रमांक-१५ | | | BB-३ | १) १८रू ३१' २२" .५४<br>२) १८रू ३१' २२" .३७<br>३) १८रू ३०' ५७" .००<br>४) १८रू ३०' ५६" .१० | ७२रू ५८' २३" .८२<br>७२रू ५८' २०" .३१<br>७२रू ५८' २८" .३७<br>७२रू ५८' २४" .८५ | लांबी ८००X रुंदी १०० | २.६३ | ५.० | ६६,९९६ | २६,५०३ | १ | ३६७०६६५५.०० | ७३४१३३१ |
| गट क्रमांक-१६ | | | BB-५ | १) १८रू ३०' ४२" .३२<br>२) १८रू ३०' ४०" .२१<br>३) १८रू ३०' १८" .४८<br>४) १८रू ३०' १६" .२१ | ७२रू ५८' ३४" .११<br>७२रू ५८' ३१" .२०<br>७२रू ५८' ५६" .७४<br>७२रू ५८' ५४" .१७ | लांबी १०००X रुंदी १०० | १.६७ | ५.० | १,१७,६६८ | ५७,०६३ | २ | ७९०३२२५५.०० | १५८०६४५१ |
| गट क्रमांक-१७ | | | BB-६ | १) १८रू ३०' १८" .४८<br>२) १८रू ३०' १६" .२१<br>३) १८रू २९' ५१" .२७<br>४) १८रू २९' ५०" .१० | ७२रू ५८' ५६" .७४<br>७२रू ५८' ५४" .१७<br>७२रू ५९' १६" .२८<br>७२रू ५९' १३" .३७ | लांबी १०००X रुंदी १०० | १.६ | ५.० | १,२०,१४१ | ६६,९६१ | २ | ९२७४०९८५.०० | १८५४८१९७ |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गट क्रमांक-१८ | | | BB-७ | १) १८रू २९' ५१" .२७<br>२) १८रू २९' ५०" .१०<br>३) १८रू २९' ३०" .००<br>४) १८रू २९' ३०" .०० | ७२रू ५९' १६" .२८<br>७२रू ५९' १३" .३७<br>७२रू ५९' ३१" .०४<br>७२रू ५९' २६" .८७ | लांबी ७२५X रुंदी १०० | २.०६ | ५.० | ७५,३१८ | ५६,५३७ | २* | ७८३०३७४५.०० | १५६६०७४९ |
| गट क्रमांक-१९ | कुंडलिका नदी/ रेवंदडा खाडी | नकाशा क्र. १२८६, सुडकोली ते कोपरी, गट -CC (खाडीच्या मुखापासून १२.६ कि.मी. अंतरावर सुरु, लांबी ५.१ कि.मी.) | CC-१ | १) १८रू २९' ३०" .००<br>२) १८रू २९' ३०" .००<br>३) १८रू २९' ०१" .६२<br>४) १८रू २९' ००" .१६ | ७२रू ५९' ३१" .०४<br>७२रू ५९' २६" .८७<br>७२ रू५९' ४५" .६८<br>७२रू ५९' ४२" .४२ | लांबी १०००X रुंदी १०० | १.९६ | ५.० | १,०७,४२० | १०२२८८ | ३* | १४१६६८८८०.०० | २८३३३७७६ |
| गट क्रमांक-२० | | | CC-२ | १) १८रू २९' ०१" .६२<br>२) १८रू २९' ००" .१६<br>३) १८रू २८' ३२" .५९<br>४) १८रू २८' ३१" .१३ | ७२रू ५९' ४५" .६८<br>७२रू ५९' ४२" .४२<br>७३रू ००' ००" .५१<br>७२रू ५९' ५७" .०८ | लांबी १०००X रुंदी १०० | १.९३ | ५.० | १,०८,४८१ | ४५,५८३ | २* | ६३१३२४५५.०० | १२६२६४९१ |
| गट क्रमांक-२१ | | | CC-३ | १) १८रू २८' ३२" .५९<br>२) १८रू २८' ३१" .१३<br>३) १८रू २८' ०३" .२४<br>४) १८रू २८' ०८" .६२ | ७३रू ००' ००" .५१<br>७२रू ५९' ५७" .०८<br>७३रू ००' १५" .६८<br>७३रू ००' १२" .६० | लांबी १०००X रुंदी १०० | १.९२ | ५.० | १,०८,८३४ | ५८,३०४ | २* | ८०७५१०४०.०० | १६१५०२०८ |
| गट क्रमांक-२२ | | | CC-४ | १) १८रू २८' ०३" .२४<br>२) १८रू २८' ०८" .६२<br>३) १८रू २७' २७" .५६<br>४) १८रू २७' २०" .९१ | ७३रू ००' १५" .६८<br>७३रू ००' १२" .६०<br>७३रू ००' ३२" .९५<br>७३रू ००' ३६" .५१ | लांबी १२००X रुंदी १०० | २.५५ | ५.० | १,०३,८८७ | ४१,५५५ | २* | ५७५५३६७५.०० | ११५१०७३५ |

टिप :- * ड्रेजरची संख्या त्याचे उत्खनन क्षमतेनुसार निश्चित करुन त्याप्रमाणे उत्खनन कालावधी ठरविण्यात येणार आहे.

सही/- (पी.डी.मलिकनेर)
अपर जिल्हाधिकारी रायगड

# जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग
# यांचे कार्यालय,

खनिकर्म शाखा, १ ला मजला, हिराकोट तलावाजवळ
ता.अलिबाग, जि.रायगड

क्र.खशा/गौख/रे.खा./ड्रे-गट/रेती लिलाव/१६-१७, दिनांक      /१०/२०१६

## सन २०१६-१७ करीता रायगड जिल्ह्यातील कुंडलिका नदी- रेवदंडा खाडीमधील यांत्रिक (ड्रेजर) पद्धतीने रेती उत्खननासाठी राखीव असलेल्या रेती उपगटांच्या ई-निविदा/ई-लिलावाची प्रक्रिया, अटी व शर्ती

**यांत्रिक साधनाद्वारे वाळू / रेती उत्खननासाठी राखीव उपगटांकरीता दिनांक ३० सप्टेंबर,२०१७ पर्यंतच्या मूदतीसाठी ई निविदा सह ई-लिलाव (सन २०१६-१७)**

**सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सूकर करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २१ मे, २०१५ रोजी अन्वये निश्चित केलेले धोरण.**

---

## सर्वसाधारण माहिती

सदरची निविदा प्रक्रिया सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती निर्गती धोरण, दिनांक २१ मे, २०१५, महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांचेकडील सी. आर. झेड विषयक अनुमती व शासन, पर्यावरण विभागाकडील पर्यावरण विषयक अनुमती आणि महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडील अनुमती/सर्वेक्षण अहवाला मधील अटी/शर्तीस अधीन राहून करण्यात येत आहे. रायगड जिल्हयातील कुंडलिका नदी – रेवदंडा खाडी मध्ये यांत्रिक साधनाद्वारे रेती उत्खननासाठी राखीव असलेल्या रेती उपगटांच्या निर्गतीसाठी ई निविदा सह ई-लिलाव पध्दतीचा अवलंब करण्यात येणार असून सदर प्रक्रियेसाठी आय.सी.आय. सी.आय. बँक व ए.बी.सी प्रोक्युअर, अहमदाबाद यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. रायगड जिल्ह्यामधील कुंडलिका नदी – रेवदंडा खाडीमधील यांत्रिक साधनांद्वारे रेती उत्खननासाठी राखीव असलेल्या ४ रेतीगटांच्या (१५ रेती उपगटांच्या) निर्गतीसाठी सन २०१६-१७ करिता दि.३०/०९/२०१७ पर्यंतच्या मुदतीसाठी ई-निवीदा सह , ई-लिलाव प्रक्रियेची सविस्तर माहिती **https://eauctioncollrai.abcprocure.com** या वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिध्द करण्यात आली आहे.

इच्छूक व्यक्तींना / संस्थांना या प्रक्रियेमध्ये भाग घेणेसाठी विनंती करण्यात येत आहे. या प्रक्रियेची सविस्तर माहिती घेणेकामी ए.बी.सी प्रोक्युअर चे प्रतिनाधी यांचेशी खालील दूरध्वनी क्रमांकावर अथवा ई-मेल आयडीवर संपर्क साधावा.

| अ. क्र. | तपशील / अडचण प्रकार | दूरध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|
| १ | रजिस्ट्रेशन करताना, डिजीटल सिग्नेचर विषयक किंवा प्रोफाईल तयार करताना तांत्रिक अडचण आल्यास | ०७९४००१६८६६/ ०७९४००१६८३८. | info@abcprocure.com |
| २ | ई निविदेसह ई लिलावा संबंधित तांत्रिक अडचण आल्यास | ०७९४००१६८७८/०७९४००१६८२३/ ०७९४००१६८७९/०७९४००१६८९५/ ०७९४००१६८६५/०७९४००१६८०२/ ०७९४००१६८५२/०७९४००१६८८३/ ०७९४००१६८३५/०७९४००१६८३७. | support@abcprocure.com |
| ३ | Online पेमेंट करताना तांत्रिक अडचण आल्यास | ०७९४००१६८६७/०७९४००१६८२८. | payment@abcprocure.com |

## ई-निविदा सह ई-लिलावाच्या अटी व शर्ती

१. प्रत्येक रेती उपगटासाठी स्थळासाठी वेगवेगळी निविदा खरेदी करावी लागेल. ई-निविदा व ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेणा-या व्यक्तींनी / संस्थांनी ऑनलाईन नोंदणी (Registration) करणे अनिवार्य राहील. ऑनलाईन नोंदणीसाठी पुढील माहिती व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करणे बंधनकारक आहे. १) ई-मेल आयडी, २) पॅन कार्ड ३) टॅन नंबर (कंपनी असल्यास), ४) मागील तीन वर्षांचे आयकर विवरणपत्रे (सन २०१३-१४ २०१४-२०१५, २०१५-१६), ५) निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र ६) निवासाचा पुरावा ७) आधार कार्ड.

२. ई-निविदा सह ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेऊ इच्छिणा-यास प्रत्येक रेती उपगटासाठी पुढील प्रमाणे ना-परतावा फी अदा कराव्या लागतील. १) नोंदणी फी (फक्त एकदाच) - रु.२८६२.५०, २) फॉर्म फी (प्रत्येक रेती उपगटाकरीता स्वतंत्र) - रु.२०००/- (अपसेट प्राईस दहा लाखांपर्यंत असणा-या रेती उपगटाकरीता) रु.५०००/- (अपसेट प्राईस दहा लाखापेक्षा जास्त असणा-या रेती उपगटाकरीता), ३) प्रक्रिया फी (प्रत्येक रेती उपगटाकरीता स्वतंत्र) - रु.१५४६/- सदरहू रकमा नेट बँकिंग/क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड (एनईएफटी/आरटीजीएस) पध्दतीने अदा कराव्या लागतील.

३. ई-निविदेसह ई-लिलावात भाग घेणा-या व्यक्तीला प्रत्येक रेती उपगटासाठी अनामत रक्कम म्हणून रु.३,००,०००/- (रुपये तीन लक्ष फक्त) किंवा अपसेट प्राईसच्या २०% यापैकी जी जास्त असेल ती रक्कम, परंतु जर रेती उपगटाची हातची किंमत रुपये १० लाखापेक्षा कमी असेल तर हातच्या किमतीच्या २० टक्के रक्कम अनामत रक्कम (EMD) म्हणून Online पद्धतीने जमा करावी लागेल. अशा पध्दतीने परिगणीत केलेली रक्कम प्रपत्र “अ” च्या रकाना १४ मध्ये रेतीगटनिहाय दाखविण्यात आली आहे. सदरची रक्कम लिलावधारकांने लिलावाच्या मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास लिलावाची मुदत संपल्यानंतर परत करण्यात येईल. अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

४. या प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या इच्छुक व्यक्तींना ई-निविदा व ई-लिलाव या दोन्हीमध्ये भाग घेणे अनिवार्य राहील. ई-निविदा न भरल्यास ई लिलावामध्ये भाग घेता येणार नाही. ज्या व्यक्तींनी ई-निविदा भरलेली असेल त्यांना पुन्हा त्याच रेती उपगटाच्या ई-लिलावाकरीता EMD अथवा फॉर्म फी व प्रक्रिया फी भरण्याची आवश्यकता राहणार नाही.

५. ई-निविदा व ई-लिलावाद्वारे प्राप्त झालेले देकार हातच्या किंमतीपेक्षा जास्त नसल्यास सदरची ई-निविदा / ई-लिलाव रद्द समजण्यात येईल.

६. प्रत्येक रेती उपगटासाठी निश्चित करण्यात आलेल्या अपसेट प्राईस (हातची किंमत) पेक्षा अधिक रकमेनेच लिलावाच्या बोलीस सुरुवात करण्यात यावी.

७. ईच्छुक लिलावधारकाने प्रत्येक रेती उपगटासाठी रु.१०.०००/- रक्कमेच्या पटीने प्रत्येक बोली बोलणे आवश्यक राहील.

८. ई-लिलावासाठी ठरविण्यात आलेली वेळ संपण्याच्या अगोदर कोणी शेवटच्या ०५ मिनिटांमध्ये बोली लावण्याचा प्रयत्न केल्यास लिलावाच्या कालावधीत १० मिनिटांची अपोआप वाढ होईल. सदरची वाढ ही तीन वेळाच वाढविण्यात येईल.

९. लिलावातील/ निविदेतील सर्वोच्च बोलीचा देकार स्विकारणेचा किंवा नाकारणेचा अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी रायगड यांना राहील. सदर निर्णय संबंधितावर बंधनकारक राहील.

१०. एखाद्या विशिष्ट अगर सर्व रेती उपगटासाठी ई-निवीदासह ई लिलाव प्रक्रिया स्थगित करणे अगर रद्द करणे तसेच प्रक्रियेतील कोणत्याही टप्प्याचा कालावधी वाढविणे याबाबतचे अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी रायगड यांनी राखून ठेवले आहेत.

११. प्रस्तावित सर्व वाळू/रेती उपगटांसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचे वतीने लिलावाची प्रक्रिया जिल्हाधिकारी रायगड यांचे कार्यालयात एकाच दिवशी आयोजित करण्यांत आली आहे. लिलावाच्या दिवशी सर्व रेती उपगटांची लिलावाची कार्यवाही पूर्ण न झाल्यास लगतच्या पुढील कामाच्या दिवशी सकाळी कार्यालयीन वेळेत पुढे सुरु करण्यात येईल.

१२. वाळू / रेती लिलाव / ठेक्याचा कालावधी- ३० सप्टेंबर २०१७ पर्यंत अथवा मंजूर लिलाव गटातील उत्खननासाठी लिलावधारकास अनुज्ञेय असलेला साठा अथवा अनुज्ञेय साठा वाहतूक करण्यास अनुज्ञेय असलेले वाहतूक पासेस संपेपर्यंत या तीन घटनेपैकी जे आधी घडेल तोपर्यंत राहील. ड्रेजरची क्षमता ही ड्रेजर रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, ड्रेजर बनवणारी कंपनी/शिपयार्डचे मॅन्युअल यावरुन जिल्हा खनिकर्म अधिकारी व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डचे अधिकारी संयुक्तरित्या खात्री करतील व त्यास जिल्हाधिकारी यांची मान्यता प्राप्त करुन घेतील. प्रस्तुत क्षमतेप्रमाणे समप्रमाणात उत्खनन होते किंवा कसे याबाबत खात्री करण्यात येईल व लिलावामध्ये नमूद केलेल्या रेती साठयापेक्षा अधिक रेतीचे उत्खनन होणार नाही याची जबाबदारी लिलावधारकाची असेल याबाबतचे संनियंत्रण जिल्हा खनिकर्म अधिकारी/महसूल अधिकारी वेळोवेळी करतील.

१३. लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्या व निविदा भरु इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला अनामत रक्कम (EMD) लिलाव सुरु होण्याच्या १ तासापूर्वी / निविदेचा अर्ज सादर करतांना online पद्धतीने भरावी लागेल.

१४. लिलावाने घ्यावयाच्या वाळू/रेती उपगटात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतुकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लिलावधारकाची राहील. त्यानंतर याबद्दलच्या कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

१५. वाळू/रेती उपगटासाठी निश्चित करण्यात आलेल्या हातच्या किंमतीपेक्षा अधिक रकमेने लिलावाच्या बोलीची सुरुवात करणे आवश्यक आहे.

१६. वाळू/रेती उपगटाच्या लिलावातील/निविदेतील सर्वोच्च बोलीचा देकार स्विकारावयाचा किंवा नाकारावयाचा निर्णय जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी रायगड हे घेतील. सदर निर्णय संबंधितास लिलावाच्या दिवशीच कळविण्यांत येईल.

१७. ज्या लिलावधारकाची बोली / निविदा स्विकारण्यात येईल, त्याला लिलावाच्या बोलीच्या रकमेच्या १/४ इतकी रक्कम लिलाव संपताच त्याच दिवशी प्रकरणपरत्वे online पद्धतीने भरावी लागेल. लिलावापूर्वी शासनजमा केलेली अनामत रक्कम (EMD) ही सदर लिलाव बोलीच्या रकमेच्या १/४ रकमेत समायोजित करण्यात येईल. तसेच, उर्वरित ३/४ रक्कम लिलावाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत प्रकरणपरत्वे Onlineपद्धतीने भरावी लागेल.

१८. लिलावात सर्वोच्च देकार देणाऱ्या लिलावधारकाने, लिलावाची संपूर्ण रक्कम विहित मुदतीत शासनजमा केल्यानंतर, त्यांनी स्वखर्चाने खरेदी करावयाच्या रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर अशा व्यक्तीबरोबर विहित अटी व शर्तीसह करारनामा करुन घेण्यात येईल. करारनामा केल्यानंतर लिलावधारकास रेती उपगटाचा प्रत्यक्षात ताबा उशीरात उशीरा सात दिवसात देण्यात येईल.

१९. विहित मुदतीनंतर लिलावाची १/४ व ३/४ रक्कम कोणत्याही परिस्थितीत स्वीकारण्यात येणार नाही. तसेच विहित कालावधीत करारनामा न केल्याने लिलावधारकास होणाऱ्या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही, याची स्पष्ट जाणीव संबंधितास करुन देण्यात येत आहे.

२०. लिलावधारकाने विहित वेळेत करारनामा करुन न दिल्यास तसेच देकाराची उर्वरित ३/४ रक्कम १५ दिवसाच्या कालावधीत न भरल्यास त्याला रेती उपगटाचा ताबा देण्यात येणार नाही. अशा वाळू/रेती उपगटाचा फेरलिलाव करण्यात येईल व त्याने भरणा केलेली १/४ रक्कम जप्त करण्यात येईल.

२१. फेरलिलावात पूर्वीच्या लिलावाच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि, फेरलिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

२२. ज्या व्यक्तीचा उच्चतम देकार स्वीकारण्यात येईल त्या देकाराच्या १० टक्के रक्कम ही जलसर्वेक्षण शुल्कापोटी (हायड्रोग्राफीक सर्वे फी) लिलावाच्या दिवशी उच्चतम देकार सादर करण्याऱ्या लिलावधारकास "**Hydrographer, Maharashtra Maritime Board**" यांच्या नावाने काढलेल्या धनाकर्षाद्वारे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे जमा करावा लागेल.

२३. लिलावधारक/परवानाधारकास जिल्हा परिषद / पंचायत समिती यांनी विहित केलेले कर/शुल्क अदा करणे बंधनकारक राहील.

२४. लिलावासंदर्भात काही तक्रारी / आक्षेप / सूचना प्राप्त झाल्यास प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी रायगड त्याची तपासणी / चौकशी करतील, तपासणी / चौकशीअंती लिलाव न करण्यास सबळ कारणे असल्याची खात्री झाल्यास लिलावाची प्रक्रिया स्थगित करण्यात येईल.

२५. वाळू/रेती उपगटांच्या लिलावात बोलण्यात आलेल्या बोलीच्या रकमा तसेच निविदाद्वारे प्राप्त झालेले देकार हातच्या किंमतीपेक्षा कमी असल्यास त्याची सविस्तर कारणे नोंदवून त्या वाळू/रेती उपगटाचा दोनदा फेरलिलाव करण्यात येईल.

२६. एकदा अत्युच्च बोली स्वीकारुन अंतिम करण्यात आलेल्या लिलावात वाळू उत्खनन करण्यास लिलावधारकास काही अडचणी /अडथळे आल्यास लिलावधारकाने याबाबत संबंधित तहसिलदार यांना माहिती देणे आवश्यक राहील. संबंधित तहसिलदार यांनी प्राप्त तक्रारीनुसार त्या रेती उपगटातून उत्खनन करण्यात येणाऱ्या अडचणींची चौकशी करुन, त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांना सादर केल्यानंतर, सदर तक्रारीच्या अनुषंगाने गरजेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, यांच्याशी विचार विनिमय करुन १५ दिवसात निर्णय घेण्यात येईल.

२७. एकदा अत्युच्च बोली स्विकारुन अंतिम करण्यात आलेल्या लिलावात कोणत्याही परिस्थितीत वाळू/रेती उत्खननाचा कालावधी वाढवून देण्याची अथवा कोणत्याही कारणास्तव वाळू/रेती उपगट बदलून देण्याची मागणी लिलावधारकास करता येणार नाही. वाळू/रेती उत्खननाचा कालावधी वाढवून देण्याचे व वाळू/रेती उपगट बदलून देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी रायगड किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना राहणार नाहीत. अपवादात्मक परिस्थितीत याबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

२८. शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार लिलाव करण्यात आलेल्या वाळू/रेती उपगटासंदर्भात कालांतराने, वाळू/रेती उपगटातून लिलावाच्या अटी/शर्तीचे उल्लंघन करुन वाळूचे उत्खनन होण्यासंबंधी किंवा अवैध/नियमबाहय वाळू उत्खननामुळे तसेच वाहतूकीमुळे खाडीकाठच्या शेतीची/रस्त्यांची हानी होण्यासंबंधी किंवा तत्सम स्वरुपाच्या तक्रारी विविध व्यक्ती व संस्थाकडून अनेकवेळा करण्यांत येतात. अशा तक्रारींची दखल घेऊन त्यासंदर्भात चौकशी करुन चौकशीच्या निष्कर्षानुसार पुढील उचित कार्यवांही करण्यासाठी विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यांत आली आहे.

२९. लिलावात दिलेल्या/परवाना दिलेल्या वाळू/रेती उपगटातून लिलावधारक/परवानाधारकास उत्खनन करण्यास स्थानिक विरोध झाल्यास किंवा नैसर्गिक किंवा लिलावधारक/परवानाधारकाच्या नियंत्रणाबाहेरील सबळ कारणामुळे अशा वाळू/रेती उपगटात उत्खनन होवू शकले नाही तर, लिलावधारक/परवानाधारकाने तक्रार/अर्ज करुन ती बाब संबंधित जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणावी. त्याबाबत चौकशी करुन वस्तूस्थिती विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर पुढील उचित कार्यवाहीसाठी सादर करण्यांत येईल. याअनुषंगाने समितीने विहित कार्यवाही करुन १५ दिवसांत तक्रारी संदर्भात योग्य तो निर्णय संबंधितांना कळविण्यांत येईल.

३०. जर तक्रारदाराला त्याच्या तक्रारीच्या संदर्भात उपरोक्त समितीने घेतलेला निर्णय मान्य नसेल तर अशा तक्रारदाराला त्याबाबत शासनाकडे अपील करता येईल. याप्रमाणे प्राप्त अपीलावर तसेच यासंदर्भात शासनस्तरावर प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत शासनस्तरावर उचित निर्णय घेण्यात येईल.

३१. लिलावाने/परवान्याने वाळू/रेती उत्खननसाठी केलेल्या करारनाम्याच्या कालावधीत शासनाने तो लिलाव/परवांना रद्द केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्रात उत्खनन करण्यास किंवा वाळू/रेती काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास/परवानाधारकास शासनावर खटला भरता येणार नाही.

३२. लिलावधारकास/परवानाधारकास कोणत्याही वैध कारणामुळे उदा. ग्रामस्थांचा विरोध, न्यायालयीन निर्णय, नैसर्गिक अडीअडचणी, प्रशासकीय यंत्रणांचा विरोध यामुळे उत्खननास किंवा वाहतूकीस बाधा आल्यास किंवा रेती उपगटाचा ताबा प्राप्त न झाल्यास आणि या कारणास्तव लिलावाचा ठेका/परवाना रद्द केला जाईल त्या कालावधीसाठी, त्याने ज्या किंमतीला लिलाव/परवाना घेतला असेल त्या रकमेच्या प्रमाणात त्याला परतावा देण्यात येईल. अशी रक्कम परत करताना लिलावाची देकाराची/परवान्याची रक्कम, लिलावातील/परवान्यातील अंदाजीत वाळूसाठा व प्रत्यक्ष उत्खनन केलेला वाळूसाठा विचारात घेऊन त्यानुसार परताव्याच्या रकमेची परिगणना करण्यात येईल.

३३. लिलावामध्ये संगनमत करुन शासनाच्या महसूलाचे नुकसान करणाऱ्या तसेच वारंवार हेतुपुरस्कर न्यायालयीन दावे उपस्थित करुन शासनाचे नुकसान करणाऱ्या लिलावधारकास काळया यादीत

(Black List) टाकण्याबाबत व ,लिलावात सहभागी होण्यास प्रतिबंध करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी रायगड यांना राहतील.

३४. लिलावधारकाने लिलावाची उर्वरित रक्कम लिलावाच्या दिनांकापासून १५ दिवसात न भरल्यास अशा लिलावधारकास संपूर्ण राज्यासाठी काळया यादीत टाकून कोणत्याही जिल्ह्यात लिलावात भाग घेण्यासाठी अपात्र ठरविण्यांत येईल.

३५. लिलावधारकाने/परवानाधारकाने मंजूर वाळू/रेती उपगटाच्या चिन्हांकित केलेल्या क्षेत्राबाहेर वाळू/रेतीचे उत्खनन केल्यास, तसेच महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने निश्चित केलेल्या खोलीपेक्षा जास्त खोल तसेच विहित केलेल्या क्षेत्राबाहेर उत्खनन केल्यास, सदर उत्खनन अवैध समजून त्याच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात येईल. तसेच त्याचा ठेका/परवाना रद्द करुन फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात येईल व जमा केलेली सर्व रक्कम जप्त करण्यांत येईल.

३६. वाळू/रेतीच्या अवैध उत्खनन/वाहतुक/साठवणूकीची प्रकरणे उघडकीस आल्यास व अशा प्रकरणी संबंधीत ठेकेदार / लिलावधारक / परवानाधारक / वाहनमालक / वाहनचालक दोषी आढळल्यास त्याच्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील नियम ४८ (७) व (८) नुसार कारवाई करण्यात येईल. प्रचलित नियमानुसार कारवाई करताना संबंधितांविरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करणे, वाहन जप्त करणे इ. कारवाई करण्यात येईल. तसेच वाळू/रेतीचे अवैध उत्खनन/वाहतूक इत्यादीच्या अनुषंगाने दंडात्मक कारवाई करताना महसूल अधिकारी/कर्मचारी यांच्यावर हल्ले होत असल्याचे निदर्शनास आल्यास व अशा ठिकाणी संघटित गुन्हेगारीचे प्रकार आढळून आल्यास अशा संघटित गुन्हेगारीविरुध्द कायद्यातील तरतुदीनुसार मोक्का सारख्या अधिनियमान्वये कारवाई करण्यांत येईल.

३७. सागरी किनारपट्टी क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर व्हावा या हेतुने वाळू उत्खनन केले जाते.त्यामुळे लिलाव/परवाना मंजूर केल्यानंतर लिलावधारकाने/परवानाधारकाने वाळू/रेती उपगटाचा ताबा घेतल्याच्या दिनांकापासून एका आठवडयाच्या आत प्रमाणशीर उत्खनन सुरु करणे आवश्यक राहील. लिलावधारक/ परवानाधारक उत्खनन प्रमाणशीर करतो किंवा कसे याबाबत सनियंत्रण करण्यांत येईल. प्रमाणशीर उत्खननाबाबत काही तक्रारी असतील तर त्याचे निवारण वर उल्लेखित समिती करील.यासंदर्भात समितीचा निर्णय अंतिम राहील.याकामी आवश्यक ते तांत्रिक सहकार्य महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचे राहील. जर लिलावधारक / परवानाधारक प्रमाणशीर उत्खनन करीत नसेल तर त्याने शासनास लिलावापोटी जमा केलेल्या रकमेव्यतिरिक्त नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी व पूरसदृश्य परिस्थिती उद्भव नये म्हणून येणारा खर्च हा दंडात्मक रक्कम म्हणून लिलावधारक / परवानाधारकाकडून वसूल करण्यांत येईल. तसेच लिलाव रद्द करण्यांत येऊन लिलावात भरलेली रक्कम जप्त करण्यांत येईल.

३८. **वाळू/रेती उत्खननावरील सर्वसाधारण निर्बंध व अटी / शर्ती :-**

वाळू / रेती उत्खननावरील सर्वसाधारण निर्बंध व अटी / शर्ती पुढीलप्रमाणे राहतील. सदर अटींचा समावेश संबंधित लिलावधारक/परवानाधारकासोबत करावयाच्या करारपत्रात करण्यांत येईल.

i. लिलावधारक / परवानाधारक यांनी पर्यावरण विषयक व सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्राच्या नियमातील तरतूदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

ii. लिलावधारक / परवानाधारक यांना मंजूर उपगटात रेती / वाळू उत्खनन व तत्सम कामे करणा-या कामगाराकडे आधारकार्ड ( Unique Identification Numbar)असणे बंधनकारक राहिल.

iii. वाळू/रेतीचे उत्खनन सकाळी ६.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीतच करता येईल. या कालावधीनंतर केलेले उत्खनन अवैध समजून कारवाई करण्यात येईल.

iv. लिलावधारकाने/परवानाधारकाने त्याला मंजूर केलेल्या रेती उपगटाच्या ठिकाणी फलक लावून, उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन सीमा दर्शविणारे खांब उभारणे अनिवार्य राहील. विहित केलेल्या क्षेत्राच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातून वाळू/रेतीचे उत्खनन करता येणार नाही.

v. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड निश्चित करतील तितक्या खोलीपर्यंतच लिलावधारक/परवानाधारकाला वाळू/रेतीचे उत्खनन करता येईल.

vi. विहित केलेल्या खोलीपेक्षा जास्त खोलीपर्यंत उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास लिलावधारक/परवानाधारकाकडून घेण्यात आलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन, लिलाव/परवाना रद्द करण्यात येईल. तसेच असे उत्खनन अवैध ठरवून नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

vii. रेल्वेपुल व रस्तेपुलाच्या कोणत्याही बाजूने ६०० मीटर्स (२००० फूट) अंतराच्या आत रेतीचे उत्खनन करता येणार नाही.

viii. वाळू/रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहील. अशा हानीची / नुकसानीची परिगणना जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांच्याकडून करण्यात येईल व त्याबाबतचा त्यांचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकीच्या वसूलीप्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

ix. वाळू / रेती वाहतूकीसाठी वाहतूक पासबाबत महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक गौखनि-१०/०२१६/प्र.क्र.१५८/ख, दिनांक २२.०३.२०१६ नुसार शासनाच्या वतीने वाहतूक पास (Transport Permit) छापून घेण्यासाठी शासनाने जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्यानूसार जिल्हाधिकारी यांनी वाळूच्या वाहतूकीसाठी आवश्यक तेवढे वाहतूक पास छापून घेवून संबंधित लिलावधारकास टप्याटप्याने वापरण्यास द्यावयाचे आहेत. लिलावधारकाने त्यांना प्राप्त झालेले वाहतूक पास वापरल्या संबंधिचा अहवाल सादर केल्यानंतरच पुढील वाहतूक पास देण्यात येतील. तसेच वाळू / रेती वाहतूकीसाठी वाहतूक पासेस देण्याबाबतची कार्यपद्धती केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक काआ १४१(अ), दिनांक १५.०१.२०१६ मधील परिशिष्ट १२ मध्ये नमूद केलेली असून सदर कार्यपद्धतीचा अवलंब करणे लिलावधारकावर बंधनकारक राहील व सदर

कार्यपद्धतीसाठी येणारा खर्च लिलावधारकास करावा लागेल. सदरची कार्यपद्धती थोडक्यात खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

१) वाहतूक पासेस (रॉयल्टी पासेस) ची वैशिष्टे खालीलप्रमाणे असतील.

अ) इंडीयन बँक असोशिएशन ने प्रमाणीत केलेल्या चुंबकीय शाईने वर्णाची ओळख (MICR- Magnetic ink Recognition) होईल अशा पेपरवर छापील केलेले असतील.

आ) त्यावर अद्वितीय (विशिष्ट) बारकोड (Unique Barcode) असेल.

इ) अद्वितीय (विशिष्ट) बारकोड हा जलद प्रतिसाद (Quick Response)देणारा असेल.

ई) सदर बारकोडमध्ये अदृश्य असे चिन्ह (Invisible Mark) असेल.

उ) सदर बारकोडमध्ये वॉटर मार्क(Water Mark)असेल.

ऊ) वाहतूक पासेस हे फरारी शाईच्या पार्श्वभूमीचे (Fugituve Ink Background) असतील.

२) खानपट्टा स्थळावर ठेकेदाराने पुढील आवश्यक बाबीची तरतूद करणे बंधनकारक आहे.

अ) पाच हेक्टरपर्यंत लहान असलेल्या रेती प्लॉटसाठी अँड्रॉईड बेस्ड इंटरनेट व सिमकार्ड असलेला स्मार्ट फोन ठेवण्यात यावा.

आ)पाच हेक्टरपेक्षा जास्त असलेल्या रेती प्लॉटसाठी २४ तास वीज पुरवठा करणा-या साधनासह सीसीटीव्ही कॅमेरा, इंटरनेट कनेक्शनसह कॅम्पूटरची तरतूद ठेकेदाराने स्वखर्चाने करावी.

इ) प्रत्येक वेळी ठेक्यावर २४ x ७ तास चालणारे **CC TV Camera** आणि **Halogen Lights** बसविणे आवश्यक राहील. किमान १० सी.सी.टि.व्ही.कँमेरा व **Halogen Lights** लावणे आवश्यक आहे. सदर **CCTV Camera व Halogen Lights** अशा पद्धतीने बसवावे की त्यात पुढील सर्व जागा त्याच्या कार्यकक्षेत येतील.

i) ज्या ठिकाणी पावती फाडण्याचे काम होते ती जागा.

ii) वाळू ठेक्यांचा स्पॉट वरुन वाळू आणि वाळू साठवण्याचे स्पॉट वरुन ज्या ठिकाणाहून गाडया बाहेर निघू शकतात व आत जाऊ शकतात अशा मार्गावर (entry & exit points), ज्या ठिकाणी वाळु उत्खनन होते अशा जागी, अशाप्रकारे CCTV Camera लावणे आवश्यक आहे की त्या वाहनाचा क्रमांक त्यामध्ये नोंदविला जाईल. सर्व ठेके सुरु झाल्यापासून संपेपर्यंत संपूर्ण ठेक्यांचे बॅकअप कायमस्वरुपी जतन केले जाईल.

iii) वाळू ठेक्याची जास्तीत जास्त जागा **cover** होतील अशा उंच ठिकाणी **CCTV Camera** लावावे कि जेणेकरुन संपूर्ण जागा **cover** करता येईल.

iv) प्रत्येक ठेकेदाराने वाळू ठेक्याच्या **CCTV Camera** मधील फुटेज प्रत्येक आठवडयाला जिल्हाधिकारी कार्यालयास व तहसील कार्यालयांस सी.डी.मध्ये किंवा पेन ड्राईव्ह किंवा **external hard disk** मध्ये सादर करावे.

v) **CCTV Camera** चे **resolution** इतके असावे कि माणसांचे चेहरे स्पष्टपणे ओळखता आले पाहीजेत आणि गाडयांचे नंबर स्पष्टपणे दिसले पाहीजेत.

vi) सर्व सी.सी.टिव्ही कॅमे-याचे फुटेज मागणीप्रमाणे अधिका-यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. तसेच हे थेट फुटेज मागणीप्रमाणे नागरिकाना पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावे लागेल.

३) वाहतूक परवाना किंवा पावती स्कॅनिंग आणि सर्व्हरवर अपलोड करणेबाबत ठेकेदाराने खालील पद्धत अवलंबणे बंधनकारक आहे.

अ) संकेत स्थळाचा वापर करुन (Website) - वाहतूक पासेस स्कॅन करुन अपलोड करण्यासाठी बारकोड स्कॅनर व संकेतस्थळाचा वापर करावा लागेल.

आ) वाहतूक पासेस स्कॅन करण्यासाठी व अपलोड करण्यासाठी अँड्रॉईड बेस्ड ॲप्लीकेशन असेल व त्यासाठी इंटरनेट कनेक्शनची तरतूद ठेकेदारास स्वखर्चाने करावी लागेल.

इ) भ्रमणध्वनीद्वारे पाठविण्यात येणा-या लघुसंदेश (SMS) – द्वारे वाहतुक पासेसची माहिती सर्व्हरवर अपलोड करावी लागेल व त्याद्वारे एक अद्वितीय इन्वाईस क्रमांक तयार होईल.

४) प्रणालीची प्रस्तावित कार्यपद्धती : -

जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या प्रिंटीग प्रेसमध्येच ठेकेदाराने वाहतूक पासेस छापून घ्यावेत व छापलेली पावती पुस्तके जिल्हाधिकारी यांचेकडून प्रमाणित करुन घ्यावीत. जिल्हाधिकारी वाहतूक पासेस ठेकेदारास देतेवेळी त्या सर्व पासेसची नोंद संबंधित ठेकेदाराच्या नावांवर सर्व्हरवर करतील. वाहतूक पासेसचे परिमाण अगोदर ठरविलेले असेल व ठेकेदारास द्यावयाच्या पासेसची एकुण संख्या रेतीगटाच्या परिमाणा एवढी असेल. रेतीची वाहतूक करताना वाहनाच्या क्षमतेनुसारच वाहतूक परवाना पासेस देणे लिलावधारकावर बंधनकारक राहील.

जेंव्हा वाहतूक पासेस स्कॅन करुन सर्व्हरवर अपलोड करण्यात येतील तेंव्हा त्याबारकोड साठी एक अद्वितीय इन्वाईस क्रमांक मिळेल व त्याची ठराविक वैधता असेल ज्यामुळे ठेकेदाराने उत्खनन केलेली सर्व माहिती सर्वरवर मिळू शकेल. वाहतूक पासेसचा दूबार वापर करता येणार नाही याबाबतची संपुर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील.

५) वाहतूक मार्गावर वाहनांची तपासणी –